शिक्षक संचालित शिक्षण संस्थेचे,

डॉ. शांतीलाल धनजी देवशी कला महाविद्यालय व वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,

वाडा, जिल्हा – पालघर

शैक्षणिक वर्ष २०२१ -२०२२

मराठी विभाग

वार्षिक अहवाल

शैक्षणिक वर्ष २०२१ - २२ या शैक्षणिक वर्षात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्या बाबतचा अहवाल पुढीलप्रमाणे आहे.

१. वाचन प्रेरणा दिन –

दि. १५ ऑक्टोबर २०२१ रोजी संपूर्ण देशभर साजरा होणारा वाचन प्रेरणा दिन आपल्या महाविद्यालयात दि. १६/१०/२०२१ रोजी सकाळी १०.३० वाजता सेमिनार हॉलमध्ये आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी मा. प्राचार्य ना.के.फडके यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्रस्ताविकातून प्रा.डॉ कैलास जोशी, मराठी विभाग यांनी वाचन प्रेरणा दिनाचे महत्व विशद करून डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या कार्याचा परिचय करून दिला. या प्रसंगी कार्यक्रमानिमित्त उपस्थितांना डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनावरील लघुपट दाखविण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व नियोजन प्रा.डॉ. किरणकुमार कवठेकर यांनी केले. तर उपस्थितांचे आभार प्रा. मयूर गवांदे यांनी मानले.

२. पुस्तक प्रकाशन समारंभ –

मराठी वाङ्मय मंडळ व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पुस्तक प्रकाशन सोहळा दि. ११/११/२०२१ रोजी सकाळी १०.३० ते १२.०० या वेळेत महाविद्यालयातील सेमिनार हॉलमध्ये आयोजित करण्यात आला होता. प्रा.डॉ. किरणकुमार कवठेकर यांनी संपादित केलेला ‘दत्तांकुरांचे काव्यलेखन’ या समीक्षा ग्रंथाचे प्रकाशन महाविद्यालयाचे मा. प्राचार्य ना.के.फडके यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रा.डॉ. कैलास जोशी, प्रमुख मराठी विभाग यांनी सदर ग्रंथावर मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन व सुत्रसंचालन प्रा.डॉ. जयश्री कवठेकर यांनी केले. या  कार्यक्रमास शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

३. कै. सु.पां कुलकर्णी स्मृतिदिन –

दि. २२ डिसेंबर २०२१ रोजी महाविद्यालयाच्या सेमिनार हॉल मध्ये शिक्षक संचालित शिक्षण संस्थेचे संस्थापक आदरणीय गुरुवर्य कै. सु.पां कुलकर्णी सर यांचा दहावा स्मृतिदिन आयोजित करण्यात आला होता. सकाळी १० ते ११ या वेळेत आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून शि.सं.शि. संस्थेचे सरचिटणीस मा. भ.भा.जानेफळकर उपस्थित होते. महाविद्यालयाचे  माजी प्राचार्य ना. के. फडके यांचीही उपस्थिती उल्लेखनीय होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी प्राचार्य डॉ. एस.एस.खांडेकर यांनी केले तर प्रा.डॉ. कैलास जोशी, प्रा.डॉ. बी.बी.चव्हाण, प्रा.डॉ. सौ. जयश्री कवठेकर यांनी प्रसंगोचित मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम प्रसंगी कै. कुलकर्णी सरांच्या भाषणाची चित्रफित दाखविण्यात आली. तसेच ‘ आदरणीय गुरुवर्य श्री. सुरेश पांडुरंग कुलकर्णी स्मृतिदिन विशेषांक’ प्रकाशित करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे आभार प्रा. सौ. सुनिता पवार यांनी आभार मानले. या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन व सूत्रसंचालन प्रा.डॉ. किरणकुमार कवठेकर यांनी केले.

४. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा –

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा दि. १४ ते १८ जानेवारी २०२२ या कालावधीत साजरा करावा असे महाराष्ट्र शासन व मुंबई विद्यापीठ, मुंबई यांनी सूचित केले होते. प्राप्त झालेल्या परिपत्रकानुसार आपल्या महाविद्यालयात दि.२७/०१/२०२२ रोजी सकाळी १० ते ११ या वेळेत ‘वाचन संस्कृती’ याविषयावर वसई येथील अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ. शत्रुघ्न फड यांचे आभासी पद्धतीने व्याख्यान आयोजित केले होते. या कार्यक्रमानिमित्त मराठी साहित्यातील ख्यातनाम लेखक अनिल अवचट यांच्या निधनाबद्दल श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी प्राचार्य डॉ. एस.एस खांडेकर यांनी केले. तर पाहुण्यांचा परिचय व उपस्थितांचे आभार प्रा.डॉ. कैलास जोशी, प्रमुख मराठी विभाग यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. किरणकुमार कवठेकर यांनी केले.

५. मराठी भाषा गौरव दिन –

आपल्या महाविद्यालयात दि. २५ फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी १०.३० ते ११.४५ या वेळेत आपल्या महाविद्यालयात ‘ कवी, कविता व प्रतिभा’ या विषयावर कालराज कॉलेज ऑफ कॉमर्स, वर्सोवा, मुंबई येथील इंग्रजी विषयाचे प्रा.डॉ. श्रीपाद जोशी यांचे व्याख्यान आयोजित केले होते. कविवर्य कुसुमाग्रज तथा. वि.वा. शिरवाडकर यांच्या २७ फेब्रुवारी या जन्मदिनानिमित्त आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. एस.एस. खांडेकर यांनी स्वागत केले तर

उपस्थितांचे आभार प्रा. संतोष भावार्थे यांनी मानले प्रा.डॉ. किरणकुमार कवठेकर यांनी सूत्रसंचालकाची भूमिका पार पाडली. प्रा. डॉ. कैलास जोशी, प्रमुख मराठी विभाग यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते.
















विभाग प्रमुख
मराठी विभाग
शिक्षक संचालित शिक्षण संस्थेचे,क
विज्ञान महाविद्यालय,वाडा,जि.ठा